An ISO 9001 : 2015, 14001:2015, 45001:2018 & 10002 : 2018 Certified Company

DEVAMRUT

# देवअमृत ॲग्रोटेक प्रा. लि.

## शेतकऱ्यांचा विकास हाच आमचा ध्यास



जैविक खते | सेंद्रिय खते | किटकनाशके | बुरशीनाशके | सुक्ष्मअन्नद्रव्ये | संजिवके | विद्राव्य खते

# Company Certifications



## देवअमृत भुमी अमृत

## Bhumi Amrut




**क्रियाशील घटक :–** **ऑरगॅनिक कार्बन, नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, सल्फर, झिंक, फेरस, इतर मुलद्रव्ये**

**फायदे :–** देवअमृत ॲग्रोटेकचे भुमीअमृत हे निंबोळी पावडर व इतर नैसर्गिक पेंडी युक्त सुक्ष्म अन्नद्रव्य व जिवाणुंच्या परिपुर्ण मिश्रणाने बनलेले गुणवत्तापुर्ण सेंद्रिय खत आहे. भुमीअमृतच्या वापराने जमिन भुसभुशीत होते व खतातील तसेच मातीतील पोषक अन्नद्रव्य पिकांना लवकरात लवकर उपलब्ध होतात. भुमीअमृतच्या वापरामुळे पांढ्या मुळांची भरगोस वाढ होऊन पोषक अन्नद्रव्याची उपलब्धता वाढते. भुमीअमृतच्या वापरामुळे फुलगळ व फळगळ थांबुन फळधारणा जोमाने होते तसेच पिकाची रोग प्रतिकारक शक्तीही वाढते. भुमीअमृतच्या वापरामुळे जमिनीमध्ये उपलब्ध अन्नद्रव्यांचा समृद्ध साठा निर्माण होऊन पिकाच्या उत्पादनात वाढ होते.

**वापरण्याची पद्धती :–** ३०० ते ४०० किलो प्रति एकरी बेसळ डोसमध्ये किंवा जमिनीतुन वापरावे. (जमिनीच्या प्रकारानुसार डोसमध्ये बदल करावा.)

**उपलब्ध पॅकिंग :–** ४० किलो

---

## देवअमृत सॉईल केअर–जी

## Soil Care - G




**क्रियाशील घटक :–** **ऑरगॅनिक कार्बन, ह्युमिक ॲसिड, अमिनो ॲसिड, फुल्विक ॲसिड, बायोएन्झायम्स, सल्फर, सिवीड एक्सट्रॅक्ट इ.**

**फायदे :–** देवअमृत सॉइल केअर – जी हे खास मातीतुन देण्यासाठी बनवलेले एक सुधारीत उत्पादन आहे जे कोणत्याही प्रकारच्या स्थानिक मातीत सहज मिसळते व पिकांची कमी वेळात अधिक चांगले सीड जर्मिनेशन (उगवणक्षमता) होते. पांढ्या मुळांची भरगोस वाढ करते. पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. जमिनीतील अन्नद्रव्ये शोषुन घेण्यासाठी पिकांना मदत करते. जमिनीतील फॉस्फरसची उपलब्धता वाढवते, जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवते. जमिनीतील जीवाणुंची संख्या वाढवते. मुळे लांब व घट्ट होतात, रोपांना संतुलित आहार देते व वाढिस पूरक ठरते. पिकांची संतुलित वाढ व एकुण आरोग्य राखते. पिकांतील पेशी विभाजनास प्रोत्साहन देते. पिकांतील स्त्रीलिंगी फुलांची संख्या वाढवते, चयापचय क्रिया व हार्मोन्सचे कार्य वाढवते. फळधारणा क्षमता वाढवते व फुले, फळे अकाली गळण्याचे प्रमाण कमी होते. रोपाला अन्नसाठा, अन्नपुरवठा करते, वाढिस मदत करते, फुलांची/फळांची संख्या वाढवते व फळांचा आकार, रंग दर्जा यात एकसमानता येते. फळे नैसर्गिकरीत्या पिकतात व त्यांची टिकाऊ क्षमता वाढते. अधिक चांगला सुगंध व मधुर चव येते. सर्वात महत्वाचे उत्पन्न वाढते व काढणीनंतर फळांचा दर्जा दिर्घकाळ टिकवण्याची क्षमता वाढवते.

**वापरण्याची पद्धती :–** ५ ते १० किलो प्रति एकरी बेसळ डोसमध्ये किंवा जमिनीतुन वापरावे. (जमिनीच्या प्रकारानुसार डोसमध्ये बदल करावा.)

**उपलब्ध पॅकिंग :–** ५ किलो, १० किलो

## देवअमृत रूट्स पॉवर

## Roots Power




**क्रियाशील घटक :–** **सुपर पोटॅशियम ह्युमेट ९८%**

**फायदे :–** हे खास मातीला देण्यासाठी बनविले आहे जे कोणत्याही प्रकारच्या स्थानिक मातीत सहज मिसळते व मातीची कॅटायोनिक एक्सचेंज क्षमता संपुर्ण वर्षासाठी वाढवते. कमी वेळात अधिक चांगले सीडजर्मिनेशन होते. पांढऱ्या मुळांची भरगोस वाढ करते. पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. जमिनीतील अन्नद्रव्ये शोषुन घेण्यासाठी पिकांना मदत करते. जमिनीतील जीवाणुंची संख्या वाढवते. मुळे लांब व घट्ट होतात, मातीतील क्षार बदल व आम्लता बदल रोधक व मुळांची निरोगी वाढ. रोपांना संतुलित आहार देते व वाढिस पुरक ठरते. मातीतील पोषकद्रव्ये दिर्घकाळ, सहज उपलब्ध होतील अशा स्वरूपात टिकवून ठेवते जी गरजेनुसार पिकांच्या वाढिसाठी मिळतात. परिस्थितीत तग धरून राहण्याची क्षमता वाढवते. ४५० चे सीईसी असल्यामुळे ओलावा व अन्नद्रव्ये टिकवून धरते. उत्पादनात भरगोस वाढ करते.

**वापरण्याची पद्धती :–** आळवणी किंवा ड्रिपद्वारे : ५०० ग्रॅम ते १००० ग्रॅम प्रति एकरी आळवणी करावी.

**उपलब्ध पॅकिंग :–** ५०० ग्रॅम, १ किलो

---

## देवअमृत सॉईल केअर

## Soil Care

**क्रियाशील घटक :–** **सिवीड अर्क, फुलविक ॲसिड, ह्युमिक ॲसिड**




**फायदे :–** हे खास मातीला देण्यासाठी बनविले आहे जे कोणत्याही प्रकारच्या स्थानिक मातीत सहज मिसळते व मातीची कॅटायोनिक एक्सचेंज क्षमता संपुर्ण वर्षासाठी वाढवते. कमी वेळात अधिक चांगले सीडजर्मिनेशन होते. पांढऱ्या मुळांची भरगोस वाढ करते. पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. जमिनीतील अन्नद्रव्ये शोषुन घेण्यासाठी पिकांना मदत करते. जमिनीतील जीवाणुंची संख्या वाढवते. मुळे लांब व घट्ट होतात, मातीतील क्षार बदल व आम्लता बदल रोधक व मुळांची निरोगी वाढ. रोपांना संतुलित आहार देते व वाढिस पुरक ठरते. मातीतील पोषकद्रव्ये दिर्घकाळ, सहज उपलब्ध होतील अशा स्वरूपात टिकवून ठेवते जी गरजेनुसार पिकांच्या वाढिसाठी मिळतात. परिस्थितीत तग धरून राहण्याची क्षमता वाढवते. ४५० चे सीईसी असल्यामुळे ओलावा व अन्नद्रव्ये टिकवून धरते. उत्पादनात भरगोस वाढ करते.

**वापरण्याची पद्धती :–** आळवणी किंवा ड्रिपद्वारे : ५०० ग्रॅम ते १००० ग्रॅम प्रति एकरी आळवणी करावी.

**उपलब्ध पॅकिंग :–** ५०० ग्रॅम, १ किलो

## देवअमृत अमिनो-जी
## Amino-G




**क्रियाशील घटक :-** **अमिनो ॲसिड ८०%**

**फायदे :-** देवअमृत अमिनो-जी हे अमिनो ॲसिडचे अद्वितीय मिश्रण आहे, यात १८ प्रकारचे अत्यावश्यक अमिनो प्रोटिन हाड्रोलायसेसच्या स्त्रोतासह एकत्र केले जातात. देवअमृत अमिनो-जी सहज पिकांच्या पोषण प्रक्रियेत शोषले जातात, यामुळे वनस्पतीमध्ये फुल व फळ धारणा भरपुर प्रमाणात होते, फळांचा आकारही वाढतो. देवअमृत अमिनो-जी पिकाची प्रतिकार शक्ती टिकवून ठेवते तसेच ताण (उच्च तापमान, कमी आर्द्रता, दुष्काळ, कीटक हल्ला, दंव आणि पूर) यास प्रतिकारक्षमतेत वाढ करते, स्टोमाटा ओपनिंग (तोंडाची पाने) वाढ नियमित करते, चेलेटिंग एजंट (बाइंडर) सुक्ष्म घटक, कच्च्या मालाचा संप्रेरक म्हणुन कार्य करते, परागण आणि भरगोस फळ निर्मितीत मदत करते, मातीतील सुक्ष्मजीवांची क्रिया वाढवते, आणि एकुणच उत्पादनात वाढ करते.

**वापरण्याची पद्धती :-** आळवणी किंवा ड्रिपद्वारे : ५०० ग्रॅम ते १००० ग्रॅम प्रति एकरी आळवणी करावी.

फवारणीसाठी : २ ते ३ ग्रॅम प्रति एकरी

**उपलब्ध पॅकिंग :-** ५०० ग्रॅम, १ किलो

---

## देवअमृत सिविड पॉवर
## Seaweed Power




**क्रियाशील घटक :-** **सिवीड एक्सर्ट्रक्ट**

**फायदे :-** देवअमृत सिवीड पॉवर हे समुद्रि शैवाल जे सध्याच्या शेतीमध्ये रासायनिक खतांना योग्य पर्याय म्हणुन याचा वापर चांगला होत आहे. देवअमृत सिवीड पॉवरमध्ये ६० प्रकारची ट्रेस एलिमेंट्स व वापरायोग्य पोषक घटक आहेत. ज्यात नायट्रोजन, पोटॅशियम, फॉस्फेट आणि मॅग्नेशियम असतात. यात वनस्पतींच्या वाढिस प्रोत्साहित करण्यासाठी संप्रेरक देखील आहेत. देवअमृत सिवीड पॉवरमध्ये १.२% नायट्रोजन असते यामुळे पानांची वाढ होण्यास मदत होते त्याचबरोबर देवअमृत सिवीड पॉवरमध्ये पोटॅशियम देखिल असते, ज्यामुळे वनस्पती अधिक जोमाने वाढण्यास मदत होते. देवअमृत सिवीड पॉवरमध्ये फॉस्फरस असते, जे झाडांना निरोगी आणि मजबूत मुळांची प्रणाली विकसित करण्यास मदत करते. देवअमृत सिवीड पॉवरच्या वापरामुळे जमिनीमध्ये हवा खेळती राहते, तसेच पाणी मुरण्याची प्रक्रिया सुधारली जाते. देवअमृत सिवीड पॉवरच्या वापरामुळे अन्नद्रव्ये शोषून घेण्याची क्षमता वाढली जाते, प्रथिन्यांचे प्रमाण वाढते व पिकांची गुणवत्ता सुधारली जाते. पिकांची रोग प्रतिकारक क्षमता वाढण्यास मदत करते, दुष्काळ सदृश्य परिस्थितीमध्ये पिकांमध्ये ताण सहन करण्याची क्षमता वाढते. सूक्ष्मअन्नद्रव्यांची उपलब्धता देवअमृत सिवीड पॉवरच्या वापरामुळे सुधारली जाते.

**वापरण्याची पद्धती :-** आळवणी किंवा ड्रिपद्वारे : ५०० ग्रॅम ते १००० ग्रॅम प्रति एकरी आळवणी करावी.

फवारणीसाठी : २ ते ३ ग्रॅम प्रति एकरी

**उपलब्ध पॅकिंग :-** ५०० ग्रॅम, १ किलो

## देवअमृत फुल्विचार्ज Fulvicharge




**क्रियाशील घटक :–** **फुल्विक ॲसिड ८५%**

**फायदे :–** देवअमृत फुल्विचार्ज मधील फुल्विक ॲसिड हा पदार्थ सुद्धा सेंद्रिय घटकाच्या विघटनानंतर तयार होतो. याची आम्लता ह्युमिक ॲसिडपेक्षा जास्त असते. बियाण्याची उगवण क्षमता व रोपाची वाढ सुधारली जाते. मुळांची व अंकुराची वाढ विकसित करण्यास मदत होते. बुरशीजन्य रोगांच्या विरोधात लढण्यासाठी प्रतिकार शक्ती वाढण्यास मदत करते. पिकांमधील रसायनांचा समतोल राखला जातो व श्वसनाची क्रिया सुधारली जाते. सुपिक माती तयार करण्यास मदत करते. त्याचबरोबर नत्र स्थिरीकरण करण्यास मदत करते. पिकाच्या उत्पन्नामध्ये व गुणवत्तेमध्ये वाढ करते. हरितद्रव्यांचे संश्लेषण वाढवते, अजैविक पदार्थांचा व जड धातूंचा नाश करते. अन्नद्रव्ये व पाणी शोषुन घेण्याची क्षमता वाढली जाते.

**वापरण्याची पद्धती :–** आळवणी किंवा ड्रिपद्वारे : ५०० ग्रॅम ते १००० ग्रॅम प्रति एकरी आळवणी करावी.
फवारणीसाठी : २ ते ३ ग्रॅम प्रति एकरी

**उपलब्ध पॅकिंग :–** ५०० ग्रॅम, १ किलो

---

## देवअमृत ऑरगॅनिक कार्बन Organic Carban




**क्रियाशील घटक :–** **ऑरगॅनिक कार्बन व एक्लोनिया मॅक्झिमा वनस्पतींचा अर्क**

**फायदे :–** **१) अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढवते :** जमिनीमध्ये सेंद्रिय कार्बनच्या वापरामुळे ९० ते ९५% नायट्रोजन, १५ ते २०% फॉस्फरस, आणि २० ते ५०% सल्फरचे स्थिरीकरण करते.

**२) माती संरचना सुधारते :** मातीमध्ये हवा आणि पाणी पोकळी निर्माण करुन चांगल्या माती संरचनेला सहाय्य करते.

**३) वनस्पती वाढिस थेट मदत :** जमिनीतील पोकळीमधील हवेत कार्बन डायऑक्साईडची वाढ होते त्यामुळे वनस्पतींची वाढ होण्यास प्रोत्साहन मिळते. मूळ वाढिस मदत, सेंद्रिय कार्बनमुळे जमिनीमध्ये हवेची पोकळी निर्माण होते त्यामुळे मुळवाढीस वाव मिळतो.

**४) जमिनीत पाणी संबंध सुधारते :** पाण्याचा अपव्यय कमी होतो. जमिनीच्या सुपीक स्थर बांधणीमुळे जमिनीचा चांगल्याप्रकारे निचरा होण्यास मदत होते.

**वापरण्याची पद्धती :–** आळवणी किंवा ड्रिपद्वारे : २ ते ५ लिटर प्रति एकरी आळवणी करा

**उपलब्ध पॅकिंग :–** १००० मिली, ५००० मिली




## देवअमृत सॉइल पॉवर

## Soil Power

**क्रियाशील घटक :–** **ऑस्कोफॉइलम नोडोसम वनस्पतीचा अर्क, ह्युमिक ॲसिड, आय.बी.ए., फुलविक ॲसिड**

**फायदे :–** हे खास मातीला देण्यासाठी बनविलेले आहे जे कोणत्याही प्रकारच्या स्थानिक मातीत सहज मिसळते व मातीची कॅटायोनिक एक्स्चेंज क्षमता संपूर्ण वर्षासाठी वाढवते. कमी वेळात अधिक चांगले सीडजर्मिनेशन होते. पांढऱ्या मुळांची भरगोस वाढ करते. पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. रोपांना संतुलित आहार देते व वाढीस पुरक ठरते. मातीतील पोषकद्रव्य दीर्घकाळ, सहज उपलब्ध होतील अशा स्वरूपात टिकवून ठेवते जी गरजेनुसार पिकाच्या वाढीसाठी मिळतात. उत्पादनात भरगोस वाढ करते.

**वापरण्याची पद्धती :–** आळवणी किंवा ड्रिपद्वारे : ४ ते ५ मि.ली. प्रतिलिटर पाण्यामध्ये किंवा २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर या गुणोत्तरात प्रति एकरी वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :–** ५०० मिली, १००० मिली, ५००० मिली.




## देवअमृत ग्रोथ मास्टर

## Growth Master

**क्रियाशील घटक :–** **अमिनो ॲसिड, फुल्विक ॲसिड, सुक्ष्म अन्नद्रव्ये, वनस्पतींचा अर्क, आय ए ए., जी.ए., ६बी.ए.**

**फायदे :–** पिकांची संतुलित वाढ व एकूण आरोग्य राखते. पिकांतील पेशी विभाजनास प्रोत्साहन देते. पिकांतील स्त्रीलिंगी फुलांची संख्या वाढवते व फळधारणेची क्षमता वाढवते. चयापचय क्रिया व हार्मोन्सचे कार्य वाढवते. पिकांतील शर्करा फिरविण्याचे कार्य करते, पेशी विभाजनावर जाणवण्याएवढा परिणाम करते. पिकवाढीचा वेग वाढवते, एकुण पिकांच्या पुनोरुत्पादनावर महत्त्वाचे कार्य करते. पिकाला अन्नसाठा, अन्नपुरवठा करते, वाढीस मदत करते, फुलांची / फळांची संख्या वाढवते व उत्पादनात वाढ होते.

**वापरण्याची पद्धती :–** १)फवारणीसाठी : ३ ते ५ मि.ली. प्रतिलिटर पाण्यामध्ये २ ते ३ वेळा फवारणी करावी.
२) आळवणी : २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर या गुणोत्तरात प्रति एकरी वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :–** ५०० मिली, १ लिटर




## देवअमृत फ्लॉवर बुस्ट — Flower Boost

**क्रियाशील घटक :–** **मिरेबन ऑइल, एल–अमिनो ॲसिड, प्रोटिन्स, व्हिटॅमिन्स व वनस्पतींचा अर्क**

**फायदे :–** वनस्पतींना खोडातील अन्नपुरवठा करते व वाढीस मदत करते, फुलांची संख्या वाढवते, फुल व फळधारणा क्षमता वाढवते, झाडाला आपली ऊर्जा बहरण्याकडे व फुल, फळधारणेला पुरवण्यास मदत करते. वनस्पतींतील शर्करा वाढवते ज्यामुळे पिकांची गुणवत्ता व दर्जा वाढतो. देठ व फळ यातील देठाची ताकद वाढवते ज्यामुळे फळ गळती थांबुन फळाची पूर्ण वाढ होते. फळांची साल घट्ट करते व फळ फुटू देत नाही.

**वापरण्याची पद्धती :–** १) फवारणीसाठी : २ ते ३ मि.ली. प्रतिलिटर पाण्यामध्ये फवारणी करावी.
२) आळवणी : २०० लिटर पाण्यामध्ये ५०० मि.ली. ते १ लिटर या गुणोत्तरात प्रति एकरी वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :–** २५० मिली, ५०० मिली, १००० मिली

---




## देवअमृत फ्रूट ॲडव्हान्स — Fruit Advance

**क्रियाशील घटक :–** **अमिनो ॲसिड, सीव्हीड एक्सट्रॅक्ट, प्रोटिन, व्हिटॅमिन, कार्बोहायट्रेट्स, मायक्रोइलेमेंट्स**

**फायदे :–** देवअमृत फ्रूट ॲडव्हान्स हे फळ आणि भाजीपाल्यांच्या आकाराच्या वाढिसाठी बनवलेले प्रमाणित सेंद्रिय उत्पादन आहे. देवअमृत फ्रूट ॲडव्हान्स हे अमिनो ॲसिड, सीव्हीड एक्सट्रॅक्ट, प्रोटिन, व्हिटॅमिन, कार्बोहायट्रेट्स, मायक्रोइलेमेंट्सने समृद्ध आहे. देवअमृत फ्रूट ॲडव्हान्स वनस्पतींची फुल व फळ धारणा क्षमता वाढवते, फळांचा आकार वाढवतो. फळांच्या विकासास मदत होते. त्यामुळे फळांची प्रतिकारशक्ती आणि उत्पादन वाढते. रंग तजेलदार होतात, चव सुधारते. बाजारपेठेत अधिक मागणी असणारे व मोठ्या आकाराचे फळ निर्मिती होते. फळांचा गर वाढवून वजन, आकार रंग व दर्जा यात एकसमानता येते. फळे नैसर्गिकरित्या पिकतात व त्यांची टिकवण क्षमता वाढते. फळांचे पाणी आणि साखरेचे प्रमाण संतुलित ठेवते त्यामुळे अधिक चांगला सुगंध व मधुर चव येते. सर्वात महत्वाचे उत्पादनात भरगोस वाढ होऊन उत्पन्न वाढवते व काढणीनंतर फळांचा दर्जा दीर्घकाळ टिकवण्याची क्षमता वाढवते. सर्व फळे आणि भाज्यांना लागू.

**सुसंगतता :** देवअमृत फ्रूट ॲडव्हान्स हे इतर कीटकनाशके, बुरशीनाशके आणि वाढ संजीवकांशी सुसंगत आहे.

**वापरण्याची पद्धत : फवारणीसाठी :** २ ते २.५ मिली प्रति लिटर पाणी किंवा ४०० ते ५०० मिली प्रति एकरी याप्रमाणे फवारणी घ्यावी.

**उपलब्ध पॅकिंग :–** ५०० मिली, १ लिटर

## देवअमृत पॉइंटर Pointer




**क्रियाशील घटक :– ॲमिनो ॲसिड, फॉलिक ॲसिड, सिवीड अर्क, मिनरल्स व व्हिटॅमिन्स, कार्बोहायड्रेटस**

**फायदे :** देवअमृत पॉइंटर मधील विविध प्रकारच्या संजिवकाच्या मिश्रणामुळे वनस्पतीतील संप्रेरके वाढवून पिकाला उपलब्ध करुन देतात, यामुळे पेशी विभाजनाचे कार्य सुरळीत पार पडते. उदा. आयएए, जीए, मिनरल्स, व्हिटॅमिन्स, कार्बोहायड्रेटस, अमिनो ॲसिड. देवअमृत पॉइंटर झाडातील चयापचये वाढवून प्रकाश संश्लेषणाच्या कार्यात मदत करते. तसेच फळधारणेच्या अवस्थेतही मदत करते. देवअमृत पॉइंटर द्राक्षामधील मण्याच्या लांबी व फुगवणीसाठी उत्कृष्ठ दर्जाचे कार्य करते, त्याच बरोबर फळाचा आकार व कलर सुधारण्यासाठी मदत करते. देवअमृत पॉइंटरमुळे फुलगळ व फळगळ होत नाही त्यामुळे पिकाचे उत्पादन वाढून पिकाचा दर्जाही सुधारतो.

**वापरण्याची पद्धत :**
**फवारणीसाठी :** २ ते ३ मिली प्रति लिटर पाणी
**डिपिंगसाठी :** १ ते २ मिली प्रति लिटर पाणी

**उपलब्ध पॅकिंग :–** ५०० मिली, १००० मिली.

---

## देवअमृत कलर किंग Colour King




**क्रियाशील घटक :– नैसर्गिक अँथोसायनिन्स, नैसर्गिक कॅरोटेनॉइड्स, नैसर्गिक क्लोरोफिल, सिवीड अर्क, नैसर्गिक सुक्ष्म मुलद्रव्ये**

**फायदे :–** फळांचा रंग (कलर), आकार व गोडी वाढवण्यासाठी. रंग (कलर) तजेलदार होतो, फळांवरती चकाकी येते व गोडी सुधारते. बाजारपेठेत अधिक मागणी असणारे व मोठ्या आकाराचे फळ निर्मिती होते. फळाचा आकार, रंग (कलर) व दर्जा यात एकसमानता येते. फळे नैसर्गिकरित्या पिकतात व त्यांची टिकाऊ क्षमता वाढते. अधिक चांगला सुगंध व मधुर चव येते. सर्वात महत्वाचे उत्पन्न वाढवते व काढणीनंतर फळांचा दर्जा दीर्घकाळ टिकवण्याची क्षमता वाढवते.

**वापरण्याची पद्धत : फवारणीसाठी :** २ ते २.५ मिली प्रति लिटर पाण्यामध्ये किंवा ५०० मिली प्रति २०० लिटर पाण्यामध्ये २ वेळा फवारणी करावी.
**आळवणी :** ५०० ते १००० मिली प्रति एकर ड्रीपद्वारे किंवा आळवणीद्वारे द्यावे.

**उपलब्ध पॅकिंग :–** ५०० मिली, १००० मिली.

## देवअमृत ड्रीप-के    Drip-K




**क्रियाशील घटक :-** **नैसर्गिक पोटॅश व सूक्ष्म अन्नद्रव्यांचे मिश्रण.**

**फायदे :-** देवअमृत ड्रीप-के हे एक आधुनिक तंत्रज्ञान वापरून बनवलेले पोटॅश मिळवून देणारे क्रियाशील उत्पादन असून हे पिकांना पोटॅशचा योग्य प्रमाणात पुरवठा करते. यात पोटॅशबरोबर इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये गरजेप्रमाणे पिकांना योग्य प्रमाणात उपलब्ध होतात. फळांच्या पक्वतेच्या वेळी देवअमृत ड्रीप-के हे उत्पादन अतिशय उपयोगी पडते. देवअमृत ड्रीप-के हे पिकांमध्ये रोगप्रतिकारक शक्ती वाढवते तसेच प्रकाश संश्लेषण क्रिया वाढवून उत्पादनात वाढ करते. देवअमृत ड्रीप-केमुळे फळांचा आकार (साईझ), गोडी, चकाकी येऊन वजनात भरपुर वाढ होते त्यामुळे साहजिकच उत्पादनातही भरगोस वाढ होते.

**वापरण्याची पद्धत :** **फवारणीसाठी :** ४ ते ५ मिली प्रति लिटर पाण्यामध्ये २ ते ३ वेळा फवारणी करावी.
**आळवणी :** २०० लिटर पाण्यामध्ये २ ते ३ लिटर या गुणोत्तरात प्रति एकरी वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :-** ५०० मिली, १ लिटर, ५ लिटर

---

## देवअमृत सुपरफर्ट    Superfert




**क्रियाशील घटक :-** **नैसर्गिक मुख्य अन्नद्रव्ये, सूक्ष्म अन्नद्रव्ये व बायो एंझाईम्सचे मिश्रण.**

**फायदे :-** देवअमृत सुपरफर्ट हे नविन सेंद्रिय उत्पादन असून हे पिकांना नत्र, स्फुरद, पालाश व सुक्ष्म अन्नद्रव्ये समप्रमाणात पुरवठा करते. पिकांच्या कायमस्वरूपी भरघोस वाढीसाठी त्यांना भरपुर प्रमाणात नत्र, स्फुरद व पालाशची तसेच काही प्रमाणांत सूक्ष्म अन्नद्रव्यांची आवश्यकता असते, पीक वाढिच्या सुरवातीच्या अवस्थेत शाकीय वाढीसाठी देवअमृत सुपरफर्ट चांगला उपयोग होतो. तसेच हे पिकांच्या सर्व अवस्थांमध्ये उदा. अंकुरण अवस्था, वाढिची अवस्था, फळधारणा अवस्था, पक्वता अवस्था यामध्ये उपयोगी पडते. खोडं, फांद्या, पान व फळांच्या भरगोस वाढिसाठी याचा वापर अतिशय लाभदायक आहे. पिकांना वाढीसाठी लागणाऱ्या नत्र, स्फुरद व पालाश व सुक्ष्म अन्नद्रव्ये तसेच बायो एंझाईम्स या अन्नद्रव्यांची भरपुर प्रमाणात उपलब्धता करून उत्पन्नात भरगोस वाढ करते.

**वापरण्याची पद्धती :-** १) फवारणीसाठी : ४ ते ५ मि.ली. प्रतिलिटर पाण्यामध्ये किंवा १००० मि.ली. २०० लिटर पाण्यामध्ये प्रति एकरी फवारणी करावी.
२) आळवणी : २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर या गुणोत्तरात प्रति एकरी वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :-** ५०० मिली, १००० मिली, ५००० मिल, २०००० मिली.




# देवअमृत न्युट्रीमिक्स NutriMix

## मिक्समायक्रोन्युट्रिएंट ग्रेड-२

**क्रियाशील घटक :-** **सूक्ष्ममूलद्रव्यांचे मिश्रण.**

**फायदे :-** देवअमृत न्युट्रीमिक्स हे अत्याधुनिक पद्धतीने तयार केलेले अमिनो ॲसिडयुक्त सूक्ष्ममूलद्रव्यांचे मिश्रण असुन पिकांमधील सर्व अवस्थांमध्ये सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढणे तसेच उत्पादनांत वाढ होण्यास मदत करते. यामध्ये लोह-२.५%, तांबे-०१%, जस्त-०३%, बोरॉन-०.५%, मँगनीज-०१%, मॉलिब्डेनम-०.१% व इतर सूक्ष्म अन्नद्रव्यांचा समावेश आहे. पिकांची रोगप्रतिकारक क्षमता वाढवते, वातावरणातील बदलांपासून पिकांचे संरक्षण करते, फुल आणि फळ गळती थांबवते, फळधारणा क्षमता वाढवते, फळांचा दर्जा आणि आकार सुधारते, उत्पादन दीर्घ काळ टिकून राहते (सेल्फ लाईफ वाढवते).

**वापरण्याची पद्धती :-** १) फवारणीसाठी : २ ते ३ मि.ली. प्रतिलिटर पाण्यामध्ये किंवा ५०० मि.ली. २०० लिटर पाण्यामध्ये फवारणी करावी.
२) आळवणी : २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर या गुणोत्तरात प्रति एकरी वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :-** ५०० मिली, १००० मिली, ५००० मिली.

---




# देवअमृत न्युट्रीसल्फ NutriSulf

**क्रियाशील घटक :-** **कांद्याच्या अर्कापासून बनवलेले ऑर्गेनिक सल्फर**

**फायदे :-** पिकाला आवश्यक असलेल्या अन्नद्रव्यांपैकी सर्वात महत्त्वाचे दुय्यम अन्नद्रव्य म्हणजे सल्फर होय. देवअमृत न्युट्रिसल्फ हा पिकांमध्ये प्रथिने तयार करण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. पिकांमध्ये विविध संप्रेरकांचे व व्हिटॅमिन्स चे कार्य व विकास होण्यासाठी देवअमृत न्युट्रिसल्फ मदत करते. पानांमध्ये हरितद्रव्ये तयार करण्यासाठी देवअमृत न्युट्रिसल्फ उपायकारक ठरते. मुळांची वाढ, दाणे भरण्याच्या प्रक्रियेत व पिकांची रोगप्रतिकारक शक्ति वाढवते. तेलवर्गीय पिकांमध्ये तेल तयार होण्याच्या क्रियेत देवअमृत न्युट्रिसल्फ आवश्यक आहे. नत्राचे रुपांतर प्रथिनात करण्यासाठी उपयुक्त. द्विदल धान्य पिकांतील मुळांवरील उपयुक्त गाठी व विविध इन्झाइम्स तयार करते. पिकांच्या खराब झालेल्या पेशींच्या दुरूस्तीसाठी गरजेचे अन्नद्रव्य.

**वापरण्याची पद्धती :-** १) फवारणीसाठी : २ ते ३ मि.ली. प्रतिलिटर पाण्यामध्ये फवारणी करावी.
२) आळवणी : २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर देवअमृत न्युट्रिसल्फ आळवणी करावी

**उपलब्ध पॅकिंग :-** ५०० मिली, १००० मिली.

## देवअमृत न्युट्रीकॅल Nutrical




**क्रियाशील घटक :–** वनस्पतींचा अर्क, सेंद्रिय घटक व मूलद्रव्यांचे मिश्रण.

**फायदे :–** देवअमृत न्युट्रीकॅल हे वनस्पतीतील सेंद्रिय अन्नद्रव्यांचा समतोल साधुन पाणी आणि पोषक तत्वांचा वापर वनस्पतींना करुन देण्यात महत्वाची भूमिका बजावतो, कॅल्शियम वनस्पतीच्या पोषक वाढीसाठी उच्च उर्जा असलेल्या घटकांची उपलब्धता करते, तसेच निरंतर निरोगी वाढिसाठी, वनस्पतींच्या मुळामध्ये कॅल्शियमची तत्काळ उपलब्धता निर्माण करते. कॅल्शियमची कमतरता अधिक प्रमाणात झाली सहसा ती मोहराच्या वेळी दर्शवली जाते. हे पर्णरंध्रामार्फत व वनस्पतींच्या मुळांमार्फत सहजरित्या उपलब्ध होते. देवअमृत न्युट्रीकॅल हे कॅल्शियम (११%) यांचे मिश्रण आहे जे वनस्पतींच्या शारीरिक बदलांना प्रतिबंधित करण्यास मदत करते आणि फळ धारणा क्षमतेत वाढ करते आणि फळांची दीर्घकाळ राहण्याची क्षमता वाढविते. वनस्पतींमधील तणाव पातळी कमी करणे. फळांची रचना, आकार आणि फळांच्या क्षमता वाढविणे. देवअमृत न्युट्रीकॅलमुळे पेशींना मजबुती येते. पिकांच्या पेशी, उती व अवयवांची लवकर वाढ व मजबुती मिळते. कॅल्शियम पिकांच्या मुळांची व पिकांची वाढ लवकर करण्यास मदत करते. कॅल्शियममुळे नत्र, लोह, बोरॉन, जस्त, तांबे आणि मँगनिजचे पिकांमध्ये शोषण वाढवले जाते, पिकांच्या गुणसुत्रांना स्थिरता येते, पिकांमध्ये शर्करेचे वहन चांगले होण्यास मदत होते, बीजोत्पादन चांगले होते.

**वापरण्याची पद्धती :–** देवअमृत न्युट्रीकॅल हे १००% पाण्यात विद्राव्य आहे.

**१) फवारणीसाठी :–** २ ते ३ मिली प्रतिलिटर पाण्यामध्ये किंवा ५०० मिली २०० लिटर पाण्यामध्ये २ ते ३ वेळा फवारणी करावी.

**२) आळवणी :–** २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर या गुणोत्तरात प्रति एकरी वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :–** ५०० मिली, १००० मिली.

---

## देवअमृत न्युट्रीबोर Nutribor




**क्रियाशील घटक :–** वनस्पतींचा अर्क, जैव उत्तेजक व मुलद्रव्यांचे मिश्रण.

**फायदे :–** देवअमृत न्युट्रीबोर हे बोरॉनचे १०.५% प्रमाण असलेले द्रवरुप मिश्रण असुन वनस्पतीतील फुलनिर्मिती, परागीभवन, फलधारणा, फळांची संख्या, बीजनिर्मिती हे सर्व बोरॉन आणि संप्रेरके यांच्या जादुई मत्रीमुळेच घडत असते. वनस्पतीमध्ये शर्कराचे हस्तांतरण प्रभावित करते, बोरॉन आणि कॅल्शियमच्या संयुक्त वापरामुळे फळाच्या सालीमध्ये टणकपणा / मजबुतपणा आणि फळ दिर्घकाळ टिकुन राहण्याची सर्वोत्तम क्षमता निर्माण करते. देवअमृत न्युट्रीबोर फुलांच्या परागनलिका, उगवण क्षमता, चयापचय आणि हार्मोन्स क्रियाकलाप यामध्ये महत्वाची भुमीका बजावते. फळांच्या वाढिसाठी, फुल निर्मिती दरम्यान, फळ आणि फांद्यामध्ये क्षमता वाढवते. फळांचे विभाजन / फुटणे कमी होते आणि फळांची साल जाड बनते, परिवहनक्षमता सुधारते आणि गुणवत्ता टिकुन ठेवते, फळांची दीर्घकाळ टिकुन राहण्याची क्षमता वाढवते. शर्करा वाहनामध्ये बोरॉनचा सहभाग फार महत्त्वाचा आहे. बोरॉनच्या कमतरतेमुळे फुले, फळे यांचे अकाली गळुन पडणे, पिकांची वाढ खुंटणे, परागीभवनात अडथळा, फळे आणि बियांची संख्या कमी होणे हे पहावयास मिळते.

**वापरण्याची पद्धती :–** देवअमृत न्युट्रीबोर हे १००% पाण्यात विद्राव्य आहे.

**१) फवारणी :–** २ ते ३ मिली प्रतिलिटर पाण्यामध्ये किंवा ५०० मि.ली. २०० लिटर पाण्यामध्ये २ ते ३ वेळा फवारणी करावी.

**२) आळवणी :–** २०० लिटर पाण्यामध्ये ५०० मिली ते १ लिटर या गुणोत्तरात प्रति एकरी वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :–** ५०० मिली, १००० मिली




## देवअमृत बोर्डेक्स Bordeaux

**क्रियाशील घटक :- बोर्डो मिश्रण.** $CuSO_4.3Cu(OH)_2.3CaSO_4$
**(स्पर्शजन्य व आंतरप्रवाही बुरशीनाशक)**

**फायदे :-** देवअमृत बोर्डेक्स हे सकेंद्रित, द्रव स्वरूपातील बोर्डोचे मिश्रण आहे. हे सर्वोत्तम दर्जाचे बुरशीनाशक स्पर्शजन्य व आंतरप्रवाही बुरशीनाशक आहे, पिकांवरील करपा, काळा करपा, पानांवरील काळ्या ठिपक्यांची बुरशी, डाऊनी मिलीड्यु, पावडरी मिलीड्यु, तांबेरा, भुरी, जीवाणुजन्य करपा व बुरशीजन्य रोग अशा विविध रोगांच्या नियंत्रणासाठी देवअमृत बोर्डेक्सचा वापर करता येतो. त्याच बरोबर जमिनीतील बुरशीमुळे होणारे मर, मुळकजि, खोडकुज इ. रोगाच्या नियंत्रणासाठीसुद्धा देवअमृत बोर्डेक्स हे एक उत्तम बुरशीनाशक आहे. ते बुरशीजन्य रोग येण्याअगोदर प्रभावशाली संरक्षक म्हणुन वापरता येते व बुरशीजन्य रोग आल्यानंतर प्रभावशाली नियंत्रक म्हणुन सुद्धा वापरता येते.

**वापरण्याची पद्धती :-** १) फवारणीसाठी : ४ ते ५ मि.ली. प्रतिलिटर पाण्यामध्ये फवारणी करावी.
२) आळवणी : २०० लिटर पाण्यामध्ये १ लिटर देवअमृत बोर्डेक्स आळवणी करावी

**उपलब्ध पॅकिंग :-** ५०० मिली, १००० मिली.

---

## देवअमृत फंगीनिल Funginil




**क्रियाशील घटक :- औषधी वनस्पतींचा अर्क, इमुलसिफायर व स्टॅबिलाझर्स यांचे मिश्रण.**

**फायदे :-** देवअमृत फंगीनिल हे एक उत्कृष्ट बुरशीनाशक आहे, हे अद्वितीय मिश्रण जीवाणुजन्य रोग व बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. भाजीपाल्याच्या पिकांमध्ये नंतरच्या आणि सुरवातीच्या करप्याला नियंत्रित करण्याची क्रिया आणि प्रभावशीलता हि देवअमृत फंगीनिलमध्ये अधिक आहे. देवअमृत फंगीनिलचे मिश्रण हे पिकांची रोप्रतिकारक क्षमता वाढवून पिकांचे उत्पादन आणि पिकांच्या उत्पादकतेवर परिणाम करणाऱ्या मोठ्या रोगांवर नियंत्रण करणारे उत्तम बुरशीनाशक आहे. हे १००% सेंद्रिय असल्याने याचा वापर सर्व प्रकारच्या निर्यात क्षम माल तयार करण्यासाठी केला जाऊ शकतो. याचा उपयोग प्रिव्हेंटिव्ह म्हणुन केल्यास चांगले रिझल्ट मिळतील.

**वापरण्याची पद्धती :-** १) फवारणीसाठी : १मि.ली. ते १.५मि.ली. प्रतिलिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

**उपलब्ध पॅकिंग :-** २५० मिली, ५०० मिली.

## देवअमृत डाऊनीनिल — Downynil




**क्रियाशील घटक :–** **इनुला विस्कोसा एक्सट्रॅक्ट, कोस्टर एक्सट्रॅक्ट, क्लोव्ह एक्सट्रॅक्ट, करंज एक्सट्रॅक्ट**

**फायदे :** देवअमृत डाऊनीनिल हे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित वनस्पतीजन्य घटकांपासुन बनवलेले सर्वोत्तम बुरशीनाशक असून ते डाऊनी रोगांवर प्रभावी नियंत्रण मिळवण्याचे काम करते. देवअमृत डाऊनीनिलच्या वापरामुळे पिकाची रोग प्रतिकारशक्ती वाढते व पीक डाऊनी रोगाला प्रतिकारक्षम बनते. डाऊनीची सुप्तावस्था झुस्पोअर्सच्या रूपात असते ती रूजण्यासाठी सतत २४ तास, १० मीमी पाऊस आणि १० डी.से. तापमान अशी स्थिती असेल तर हे झुस्पोअर्स रूजुन पानांवर ईन्फेक्शन करतात. ह्या प्राथमिक प्रादुर्भावानंतर पानांवर ५ ते १० दिवसात लक्षणे दिसुन येतात. या काळात किंवा प्रतिबंधात्मक म्हणून देवअमृत डाऊनीनिल या उत्पादनाची फवारणी घेतल्यास उत्तम परिणाम दिसून येतील.

**सुसंगतता :** देवअमृत डाऊनीनिल हे इतर किटकनाशके, बुरशीनाशके आणि वाढ संजीवकांशी सुसंगत आहे.

**वापरण्याची पद्धती :–** फवारणीसाठी : २ ते ३ मिली प्रति लिटर पाणी किंवा ५००मिली प्रति एकरी किंवा प्रति २०० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी.

**उपलब्ध पॅकिंग :–** २५० मिली, ५०० मिली.

---

## देवअमृत फायटर — Fighter




**क्रियाशील घटक :–** **औषधी वनस्पती अर्क, इमुलसीफायर व स्टेबिलायझर्स यांचे मिश्रण.**

**फायदे :–** देवअमृत फायटर हे वनौषधींच्या अर्कावर आधारीत एक प्रभावशाली सेंद्रिय किटकनाशक आहे जे सर्व प्रकारच्या अळीवर्गीय (चियुंग पेस्ट) किटकाच्या नियंत्रणासाठी प्रभावीपणे कार्य करते. देवअमृत फायटर हे औषधी वनस्पती अर्क व सॉल्व्हन्ट या नविन घटकांवर आधारीत एक अत्यंत प्रभावशाली किटकनाशक असून याचे कार्यप्रणाली ही प्रतीबंधात्मक असुन हे किटकांच्या पचन संस्था व मज्जासंस्थेवर परिणाम दर्शवून किटकांची भुक मंदावते, किटक हळूहळू विकलांग होऊन मरण पावतात. हेलिओथिस, स्पोडोपेटरा, डी.बी.एम. लिपोडोपेटरा, फळ पोखरणारी अळी, शेंड्यातील अळी, नाग अळी, अश्या सर्व प्रकारच्या फळ व पान कुडतरणाऱ्या अळ्यांचा नायनाट करण्यासाठी देवअमृत फायटर हे अत्यंत प्रभावशाली ठरले आहे. देवअमृत फायटर हे संपूर्णत: सेंद्रिय पद्धतीवर आधारीत असल्यामुळे याचा उपयोग प्रिव्हेंटीव्ह म्हणुन केल्यास चांगले रिझल्ट मिळतील.

**वापरण्याची पद्धती :–** १) फवारणीसाठी : २ मिली ते ३ मिली प्रतिलिटर पाण्यामध्ये किंवा ५०० मि.ली. २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून प्रति एकरी फवारणी करावी.

**उपलब्ध पॅकिंग :–** २५० मिली, ५०० मिली.

## देवअमृत फिनिश बोअर Finish Borer




**क्रियाशील घटक :–** **टोबॅको एक्सट्रॅक्ट, निम एक्सट्रॅक्ट, करंज एक्सट्रॅक्ट, सॉल्वन्ट, ब्लॅक पेपर**

**फायदे :** देवअमृत फिनिश बोअर हे सर्व प्रकारच्या अळीवर्गीय किडींच्या नियंत्रणासाठी बनवलेले उत्कृष्ठ दर्जाचे वनस्पतीजन्य किटकनाशक असून ते जसे की खोडअळी, शेंडाअळी, फळअळी, पिनहोल बोअरर इ. नियंत्रित करू शकते. देवअमृत फिनिश बोअर हे वनस्पतींचे पोषण आणि हवामानापासुन संरक्षण देण्यासाठी अनेक वनस्पती अर्क आणि जैव उत्तेजकांवर आधारित बनवलेले नाविन्यपूर्ण उत्पादक आहे. देवअमृत फिनिश बोअर हे रोग आणि किटकांना प्रतिकार करण्याची वनस्पतींची क्षमता वाढवते. वनस्पती अर्क नैसर्गिकरित्या अळीवर्गीय किटक आणि इतर किटकांपासून वनस्पतींचे संरक्षण करते. देवअमृत फिनिश बोअरच्या वापराने किटकांच्या पचन संस्थेवर अनिष्ठ परिणाम होऊन किटक विकलांग होतो, हळूहळू किटकांच्या शरिरात विष जाऊन आणि किटक लगेच मरतात.

**सुसंगतता :** देवअमृत फिनिश बोअर हे इतर किटकनाशके, बुरशीनाशके आणि वाढ संजीवकांशी सुसंगत आहे.

**वापरण्याची पद्धती :–** फवारणीसाठी : २ ते ३ मिली प्रति लिटर पाणी किंवा ५००मिली प्रति एकरी किंवा प्रति २०० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी.

**उपलब्ध पॅकिंग :–** २५० मिली, ५०० मिली.

---

## देवअमृत गार्ड (नीम १००००) Guard Neem 10000




**क्रियाशील घटक :–** **नीम अर्क, इमूलसीफायर व स्टेबिलायझर्स यांचे मिश्रण.**

**फायदे :–** देवअमृत गार्ड हे प्राचीन आयुर्वेदावर आधारित एक प्रभावशाली सेंद्रिय कीटकनाशक आहे जे सर्वप्रकारच्या रसशोषक (सकिंग पेस्ट) कीटकाच्या नियंत्रणासाठी प्रभावीपणे कार्य करते. देवअमृत गार्ड हे नीम अर्क या घटकावर आधरित एक अत्यंत प्रभावशाली कीटकनाशक असून याची कार्यप्रणाली फुलकिडे, थ्रिप्स, मावा, तुडतुड, हिरवा मावा, लाल कोळी, नाग अळी यासारख्या रस शोषणाऱ्या कीटकांचे नियंत्रण करण्यासाठी तयार केलेले आहे. हे पिकांमध्ये रोग प्रतिकारक शक्ती वाढवून पिकांचे किटकांपासुन प्रभाविपणे संरक्षण करते. देवअमृत गार्डचा वापर सर्वप्रकारच्या भाजीपाला, पिके, द्राक्ष, फळझाडे, कापुस, फुलझाडे, वेलवर्गीय पिके, ग्रीन हाऊस व पॉली हाऊसमध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्ये करू शकतो. देवअमृत गार्ड हे संपूर्णतः सेद्रिय पद्धतीवर आधारित असल्यामुळे याचा उपयोग प्रिव्हेंटिव्ह म्हणुन केल्यास कीटकांपासुन पिकांचे संरक्षण होण्यास अत्यंत लाभदायक ठरेल. ज्यामुळे पिकांमध्ये भरगोस उत्पन्नवाढ मिळते.

**वापरण्याची पद्धती :–** १) फवारणीसाठी : १ मिली ते १.५ मिली प्रतिलिटर पाण्यामध्ये किंवा २५० मि.ली. २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून प्रति एकरी फवारणी करावी.

**उपलब्ध पॅकिंग :–** २५० मिली, ५०० मिली, १००० मिली.

## देवअमृत गार्ड प्लस  Guard Plus




**क्रियाशील घटक :–** **एरंड तेल, निम तेल व औषधी वनस्पती अर्क, इमुलसीफायर व स्टेबिलायझर्स यांचे मिश्रण.**

**फायदे :–** देवअमृत गार्ड प्लस हे प्राचीन आयुर्वेदावर आधारित एक प्रभावशाली सेंद्रिय कीटकनाशक आहे जे सर्वप्रकारच्या रसशोषक (सकिंग पेस्ट) कीटकाच्या नियंत्रणासाठी प्रभावीपणे कार्य करते. देवअमृत गार्ड प्लस हे एरंड तेल, निम तेल व औषधी वनस्पती अर्क या नविन घटकावर आधरित एक अत्यंत प्रभावशाली कीटकनाशक असून याची कार्यप्रणाली फुलकिडे, थ्रिप्स, मावा, तुडतुडे, हिरवा मावा, लाल कोळी, नाग अळी यासारख्या रस शोषणाऱ्या कीटकांचे नियंत्रण करण्यासाठी तयार केलेले आहे. देवअमृत गार्ड प्लस हे १००% सेंद्रिय असल्याने याचा वापर सर्व प्रकारच्या निर्यात क्षम माल तयार करण्यासाठी केला जाऊ शकतो. याचा उपयोग प्रिव्हेंटिव्ह म्हणुन केल्यास चांगले रिझल्ट मिळतील.

**वापरण्याची पद्धती :–** १) फवारणीसाठी : १ मिली ते १.५ मिली प्रति लिटर पाण्यामध्ये किंवा २५० मि.ली. २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून प्रति एकरी फवारणी करावी.

**उपलब्ध पॅकिंग :–** २५० मि.ली., ५०० मि.ली.

---

## देवअमृत नीम करंज+  Neem Karanj+




**क्रियाशील घटक :–** **नीम ऑईल, करंज ऑईल, इमुलसीफायर व स्टेबिलायझर्स यांचे मिश्रण.**

**फायदे :–** देवअमृत नीम करंज+ हे प्राचीन आयुर्वेदावर आधारित एक प्रभावशाली सेंद्रिय कीटकनाशक आहे जे सर्वप्रकारच्या रसशोषक (सकिंग पेस्ट) कीटकाच्या नियंत्रणासाठी प्रभावीपणे कार्य करते. देवअमृत नीम करंज+ हे नीम अर्क व करंज या भारतात उगवणाऱ्या घटकावर आधरित एक अत्यंत प्रभावशाली कीटकनाशक असून याची कार्यप्रणाली फुलकिडे, थ्रिप्स, मावा, तुडतुड, हिरवा मावा, लाल कोळी, नाग अळी यासारख्या रस शोषणाऱ्या कीटकांचे नियंत्रण करण्यासाठी आणि वनस्पतीतील कीड, रोग, मातीतील किटक व बुरशीजन्य रोगांपासुन पिकांचे संरक्षण करण्यासाठी तयार केलेले आहे. देवअमृत नीम करंज+ हे पिकांमध्ये रोग प्रतिकारक शक्ती वाढवून पिकांचे किटकांपासुन प्रभाविपणे संरक्षण करते. हे प्रतिबंधात्मक म्हणुन वापल्यास किडीचा प्रादुर्भाव टाळेल परिणामी पिकांचे नुकसान व हानी कमी होते. याचबरोबर उत्पन्नात भरगोस वाढ होते.

**वापरण्याची पद्धती :–** १) फवारणीसाठी : १ मिली ते २ मिली प्रतिलिटर पाण्यामध्ये किंवा २५० मिली २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून प्रति एकरी फवारणी करावी.

**उपलब्ध पॅकिंग :–** २५० मिली, ५०० मिली, १००० मिली.

## देवअमृत व्हायरोकिलर Virokiller




**क्रियाशील घटक :-** **औषधी वनस्पतींचा अर्क, जैव उत्तेजक व इमुलसीफायर**

**फायदे :-** देवअमृत व्हायरोकिलर हे औषधी वनस्पती अर्कांवर आधारित जैव-उत्तेजक समाविष्ठ एक नवीन व्हायरस प्रतिबंधक प्रॉडक्ट आहे. देवअमृत व्हायरोकिलर हे वनस्पतीचे चयापचय सुधारते, फांद्या व पानांना सुदृढ बनवून अन्ननिर्मिती क्षमता वाढवते. देवअमृत व्हायरोकिलर हे वनस्पतींना व्हायरसच्या हल्ल्यापासून प्रतिबंधित होण्यासाठी ऊर्जा प्रदान करते. व्हायरसचा प्रादूर्भाव झालेल्या वनस्पतींना जलद पुनर्प्राप्तीसाठी पौष्टिक ऊर्जा आणि जैव-उत्तेजक घटकांची निर्मिती करुन देते. देवअमृत व्हायरोकिलर हे जैव उत्तेजकांचे एक उत्तम मिश्रण आहे जे वनस्पतींना व्हायरसपासुन मुक्त होण्यास आणि निरोगी पिके ठेवण्यास मदत करते. वनस्पतींच्या निरोगी वाढीसाठी ऊर्जा प्रदान करुन वनस्पतींच्या सर्वांगीण विकासाची हमी देऊन उत्पादन वाढवते.

**वापरण्याची पद्धती :-** १ ते १.५ मिली प्रतिलिटर पाण्यामध्ये किंवा २५० मिली २०० लिटर पाण्यामध्ये मिसळुन फवारणी करावी.

**आळवणी :-** ५०० मिली ते १००० मिली प्रति एकरी आवळणी घ्यावी.

(उत्तम परिणामांकरीता देवअमृत स्टीकोस्प्रेडचा १०० मिली प्रति २०० लिटर पाण्याकरीता वापर करावा.)

**उपलब्ध पॅकिंग :-** २५० मिली, ५०० मिली.

---

## देवअमृत तेल्यातुफान Telya Tufan




**क्रियाशील घटक :-** **औषधी वनस्पतींचे अर्क (अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल), अल्कॉइड्स, इमुलसीफायर व स्टेबिलायझर्स यांचे मिश्रण.**

**फायदे :-** डाळिंबावरील तेल्या रोगास बॅक्टेरिअल ब्लाईट म्हणुनही ओळखले जाते. तेल्या रोगावरील एक नाविण्यपुर्ण जीवाणुनाशक औषधी विकसीत केले आहे. या जिवाणुंचा नाश करण्यासाठी आता तेल्या तुफानचा वापर यशस्वीपणे केला जाऊ शकतो. या रोगास झॅंतोमोनास ॲकसोनोपोडीस पीव्ही पूनिसीया हा जीवाणू जबाबदार असतो. तेल्या तुफानच्या वापरानंतर ३ ते ४ दिवसांत तेलकट डाग कमी होतील. ते वाढणार नाहीत व पुर्ण पणे काळे पडून वाळून जातील व तेल्याचा प्रादुर्भाव पुर्णपणे नाहीसा होण्यास तेल्या तुफानचा फायदेशीर वापर होईल.

**वापरण्याची पद्धती :-** १) फवारणीसाठी : २ ते ३ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.

२) आळवणी किंवा ड्रिपद्वारे : १ ते २ लिटर प्रति २०० लिटर पाण्यातुन एका एकरासाठी सोडावे.

**उपलब्ध पॅकिंग :-** ५०० मिली, १००० मिली

## देवअमृत स्टीकोस्प्रेड — Sticko Spread




**क्रियाशील घटक :–** **सिलिकॉन आधारित स्टिकर, स्प्रेटर, पेनिट्रेटर, ॲक्टिवेटर, पी. एच. बॅलन्सर**

**फायदे :–** देवअमृत स्टीकोस्प्रेड मधिल सिलिकॉन हा घटक पिकांमध्ये रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतो, म्हणुनच पिकांमध्ये कीटक, रोग व ताणतणावाचा प्रतिकार करण्याची शक्ती निर्माण होते. देवअमृत स्टीकोस्प्रेड हे पिकांची पाने, फळे आणि पिकांची साल यांच्या गुळगुळीत पृष्ठभागावर पडणारा प्रत्येक थेंब व्यवस्थितरित्या चिकटून धरते आणि त्यामुळे प्रत्येक औषधांचे आंतरप्रवाही कार्य प्रभावीपणे होते व नुकसान कमी होते. देवअमृत स्टीकोस्प्रेडमुळे पाण्याच्या द्रावणाचा पी.एच.(सामु) सुधारतो. देवअमृत स्टीकोस्प्रेड हे वेगवान प्रसारक्रिया असणारे नॉन–आयनिक वेटिंग एजंट आहे जे फवारणी द्रावण फवारणीनंतर पानांच्या पृष्ठभागावर फार वेगाने पसरायला मदत करते. ज्यामुळे औषधांचे द्रावण पानांच्या सर्व बाजूला समप्रमाणात मिळते. देवअमृत स्टीकोस्प्रेड हे सर्व प्रकारचे खते, सुक्ष्म अन्नद्रव्ये, टॉनिक्स, किटकनाशके, बुरशीनाशके, तणनाशके इत्यादी घटकांबरोबर वापरता येते.

**वापरण्याची पद्धती :–** १) फवारणीसाठी : १०० मि.ली. २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून प्रति एकरी फवारणी करावी.

**उपलब्ध पॅकिंग :–** १०० मिली, २५० मिली.

---

## बायोअमृत मायकोरायझा — Mycorrhiza




**क्रियाशील घटक :–** **ॲझोटोबॅक्टर, ॲसिटोबॅक्टर, रायझोबियम, पीएसबी, केएमबी याचे मिश्रण**

**फायदे :** देवअमृत मायकोरायझा पांढऱ्या मुळ्यांची अधिक संख्या वाढवते. देवअमृत मायकोरायझा मुळे पिक अधिक जोमदार आणि निरोगी तयार होते. देवअमृत मायकोरायझा बियाणे किंवा रोप लावणींच्या वेळी पिक सेठ होऊन त्याचे अस्तित्व वाढवते. देवअमृत मायकोरायझा फुलांची आणि फळांची संख्या वाढवते. देवअमृत मायकोरायझामुळे पिक कमी पाऊस किंवा कमी पाणी असल्यावर सुद्धा तग धरून राहते. देवअमृत मायकोरायझा पिकांची उत्पादकता आणि गुणवत्ता वाढवते. देवअमृत मायकोरायझा रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढवूनअन्नद्रव्य पिकाला उपलब्ध करूनदेणे, विशेषत: फॉस्फरस, फेरस आणि झिंक इ. देवअमृत मायकोरायझा जमिनीची सुपीकता टिकून ठेवून अन्नद्रव्य आणि पाणी मिळवून देते. वेगवेगळ्या पर्यावरणाच्या ताणतणावांमध्ये सुद्धा देवअमृत मायकोरायझा पिकांची सहनशीलता वाढवते. पिकांचे घातक बुरशी पासून संरक्षण करण्यास मदत करते. शारपड, चोपण व पाणी जास्त वेळ धरून ठेवणाऱ्या जमिनीमध्ये देवअमृत मायकोरायझा अधिक उत्तम काम करते. शिवात या बुरशीमुळे जमिनीची साशिद्रता प्रक्रियेत मोठी भूमिका असते आणि त्यामुळे सुक्ष्मजीव क्रिया उत्तेजित होते.

**वापरण्याची पद्धती :**

**१) फवारणीसाठी :** ५ मिली प्रतिलिटर पाणी याप्रमाणे व्यवस्थित फवारणी करावी.

**२) आळवणी :** २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर प्रति एकरी, तर ठिबक सिंचनाद्वारे ५ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :** १०० ग्रॅम, २५० ग्रॅम

## बायोअमृत एनपीके

## NPK CFU Count : 5 X $10^9$ cfu/ml




**क्रियाशील घटक :– ॲझोटोबॅक्टर, ॲसिटोबॅक्टर, रायझोबियम, पीएसबी, केएमबी याचे मिश्रण**

**फायदे :** बायोअमृत एनपीके लिक्विड कंसोर्टिया हे वनस्पतींच्या वाढिला उत्तेजन देणाऱ्या पदार्थांना वाढवते आणि त्यानुसार बीजांकुरणाची आणि रोपांचीही वाढ होते. बायोअमृत एनपीके लिक्विड कंसोर्टिया हे पिकांना नत्र स्फुरद, पालाश उपलब्ध करून देतो. त्यामुळे पिकांना भरपुर प्रमाणात अन्नद्रव्ये पुरवठा होऊन पिकांची वाढ व्यवस्थितरीत्या होते. पिकांमध्ये भरपुर प्रमाणात अन्नद्रव्येसाठा झाल्यामुळे पिकांची वाढ व विकासास चालना मिळुन झाडांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते व उत्पादनात हि भरपुर वाढ मिळते.

**पिके :** डाळिंब, द्राक्षे, आंबा, ज्वारी, बाजरी, गहू, मका, ऊस, कापुस, सुर्यफुल, मिरची, वांगी, पेरू तसेच सर्व कडधान्य व फुलझाडे इ.

**वापरण्याची पद्धती :**

**१) फवारणीसाठी :** ५ मिली प्रतिलिटर पाणी याप्रमाणे व्यवस्थित फवारणी करावी.

**२) आळवणी :** २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर प्रति एकरी, तर ठिबक सिंचनाद्वारे ५ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :** १ लिटर, ५ लिटर

---

## बायोअमृत पीएसबी

## PSB CFU Count : 2 X $10^9$ cfu/ml




**क्रियाशील घटक :– स्फुरद विरघळविणारे जीवाणु**

**फायदे :** नत्राच्या खालोखाल स्फुरद पिकांच्या प्रमुख अन्नद्रव्यांपैकी एक आहे. रासायनीक खतांद्वारे पुरविलेल्या स्फुरदापैकी ७० ते ८० टक्के स्फुरद जमिनीतील निरनिराळ्या रासायनिक प्रक्रियांमुळे स्थिर होऊन ते पाण्यात न विरघळणाऱ्या (घट्ट) स्वरुपात परिवर्तीत होतात. असे घट्ट स्वरुपातील स्फुरद विरघळुन द्राव्य स्वरुपात रूपांतर करण्याचे कार्य स्फुरद विरघळविणारे सूक्ष्मजीव करतात. पाण्यात विरघळणारे द्राव्य स्वरूपातील स्फुरदच पिकांची मुळे शोषुन घेऊ शकतात. बुरशीवाणातील ॲस्परजीलस, अवामोरी आणि पेनिसिलीयम डीजीटॅटम तर अणुजीव प्रकारातील बॅसिलस पॉलीमीक्झा, बॅ. मेगाथेरीयम आणि बॅ. स्ट्रायटा हे कार्यक्षम स्फुरद विरघळविणारे सूक्ष्मजीव आहेत. स्फुरद जीवाणु खत वापरले असता अधिक प्रमाणात स्फुरद शोषले जाते. जीवाणु खते सेंद्रिय शेतातील महत्वाचा घटक असुन पर्यावरणाचे संवर्धन होते. यांच्या वापरामुळे बियाणांची चांगली व लवकर उगवण होते. नत्र स्फुरद व इतर अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढुन पिकांची जोमदार वाढ होते आणि पिकांची रोग व किड प्रतिकारक शक्ती वाढते. रासायनीक खतांची २० ते २५ % मात्रा कमी होऊन उत्पादन खर्चात बचत होते व पिक उत्पादन १० ते १५ टक्क्याने वाढते. तसेच जमिनीची सुपिकता वाढून पोत सुधारतो आणि दुसडीच्या पिकांवर चांगला परिणाम होतो. जिरायत जमिनीतही जीवाणु खतांचा चांगला फायदा होतो.

**पिके :** डाळिंब, द्राक्षे, आंबा, ज्वारी, बाजरी, गहू, मका, ऊस, कापुस, सुर्यफुल, मिरची, वांगी, पेरू तसेच सर्व कडधान्य व फुलझाडे इ.

**वापरण्याची पद्धती :**

**१) फवारणीसाठी :** ५ मि.ली. प्रतिलिटर पाण्यामध्ये किंवा १००० मि.ली. २०० लिटर पाण्यामध्ये २ ते ३ वेळा फवारणी करावी.

**२) आळवणी :** २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर या गुणोत्तरात प्रति एकरी वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :** १ लिटर, ५ लिटर

## बायोअमृत केएमबी

**KMB** CFU Count : 2 X $10^9$ cfu/ml




**क्रियाशील घटक :-** **पालाश विरघळविणारे जीवाणु**

**फायदे :** जमिनीमध्ये पालाश या अन्नद्रव्यांची मुबलकता असुनही तो स्थिर स्वरूपात असल्याने पिकांना उपलब्ध होत नाही. हे जीवाणु स्थिर स्वरुपातील पालाशातुन जैव रासायनिक क्रियांद्वारे पालाश मुक्त करतात व पिकाला उपलब्ध करुन देतात. पालाश या मुलद्रव्यांचे वहन होत नाही. हे जीवाणु पालाशची वहन क्रियाही सक्रिय करतात. फ्राटेरिया ऑरेंशिया हे जीवाणु स्थिर स्वरूपातील पालाश जैव रासायनीक क्रियांद्वारे मुक्त करतात. यामुळे फळांची फुगवण व्यवस्थित होऊन जीवाणु खते सेंद्रिय शेतातील महत्त्वाचा घटक असुन पर्यावरणाचे संवर्धन होते. यांच्या वापरामुळे बियाणांची चांगली व लवकर उगवण होते. नत्र स्फुरद व इतर अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढून पिकांची जोमदार वाढ होते आणि पिकांची रोग व कीड प्रतिकारक शक्ति वाढते. रासायनिक खतांची २० ते २५% मात्रा कमी होऊन उत्पादन खर्चात बचत होते व पिक उत्पादन १० ते १५ टक्क्याने वाढते. तसेच जमिनीची सुपिकता वाढुन पोत सुधारतो आणि दुसडीच्या पिकांवर चांगला परिणाम होतो. जिरायत जमिनीत जीवाणु खतांचा चांगला फायदा होतो.

**पिके :** डाळिंब, द्राक्षे, आंबा, ज्वारी, बाजरी, गहू, मका, ऊस, कापुस, सुर्यफुल, मिरची, वांगी, पेरू तसेच सर्व कडधान्य व फुलझाडे इ.

**वापरण्याची पद्धती :**

**१) फवारणीसाठी :** ५ मि.ली. प्रतिलिटर पाण्यामध्ये किंवा १००० मि.ली. २०० लिटर पाण्यामध्ये २ ते ३ वेळा फवारणी करावी.

**२) आळवणी :** २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर या गुणोत्तरात प्रति एकरी वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :** १ लिटर, ५ लिटर

---

## बायोअमृत ट्रायको

**Tricho** CFU Count : 2 X $10^9$ cfu/ml




**क्रियाशील घटक :-** **ट्रायकोडर्मा व्हिरिडीचे मिश्रण**

**फायदे :** निसर्गामध्ये अनेक प्रकारच्या बुरशी असुन, त्यातील काही पिकांवर रोगकारक असतात, तर काही बुरशी पिकांचे रोगांपासुन संरक्षण करणाऱ्या असतात. बायोअमृत ट्रायको ही एक अशीच उपयुक्त बुरशी आहे.कापुस, कडधान्य, तेलबिया, भाजीपाला व ऊस अशा विविध पिकांवर सुरवातीच्या काळात मर, मूळकुज, कॉलररॉट, खोडकुज आणि जमिनीवर वाढणारे अनेक बुरशीजन्य रोग आढळून येतात. बऱ्याचदा रोपवाटिकेतील रोपे अचानक माना टाकतात. या रोगांसाठी फ्युजारियम, रायझोक्टोनिया, फायटोप्थोरा, पीथियम अशा बुरशी कारणीभूत असतात. त्यांच्या नियंत्रणासाठी बुरशीनाशकांचा वापर केला जात असला तरी पर्यावरणपूरक पर्याय म्हणुन बायोअमृत ट्रायको जैविक बुरशीनाशकांचा वापर फायदेशीर ठरतो. यामध्ये ट्रायकोडर्मा बुरशी उपयुक्त ठरते. ही बुरशी बियाण्यांवर रोग पसरविणाऱ्या बुरशींची वाढ होऊ देत नाही. बायोअमृत ट्रायको ही बुरशीच्या धाग्यांना विळखा घालुन, त्यातील पोषक द्रव्य शोषुन घेते.परिणामी रोगकारक बुरशींमध्ये कार्बन, नायट्रोजन, जीवनसत्त्वांची कमतरता निर्माण होते. त्यांची वाढ खुंटते. ही बुरशी ग्लायटॉक्झिन व व्हीरिडीन नावाचे प्रतीजैविक निर्माण करते. ते रोगकारक बुरशींना मारक ठरते. बायोअमृत ट्रायको मधील उपयुक्त बुरशींची बीजप्रक्रिया केल्यामुळे उगवणशक्ति वाढण्यास मदत होते. रोगकारक बुरशींचा नायनाट होतो. पिकांच्या संपुर्ण वाढीच्या अवस्थेपर्यंत संरक्षण करते. जमिनीतील सेंद्रिय पदार्थ कुजवण्यास मदत होते. त्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो.

**पिके :** डाळिंब, द्राक्षे, आंबा, ज्वारी, बाजरी, गहू, मका, ऊस, कापुस, सुर्यफुल, मिरची, वांगी, पेरू तसेच सर्व कडधान्य व फुलझाडे इ.

**वापरण्याची पद्धती :**

**बिजप्रक्रिया :** १० ते २० मिली प्रति किलो बियाणे याप्रमाणे बिजप्रक्रिया करावी.

**फवारणी :** ४-५ मिली प्रति लिटर पाणी

**आळवणी :** १-२ लिटर प्रति २०० लिटर पाणी/एकर

**उपलब्ध पॅकिंग :** १ लिटर, ५ लिटर

# बायोअमृत सुडो

**Pseudo** CFU Count : 2 X $10^9$ cfu/ml




**क्रियाशील घटक :–** **सुडोमोनस फ्लोरेसेन्सचे मिश्रण**

**फायदे :** बायोअमृत सुडोमधील सुडोमोनस फ्लोरेसेन्स हे जीवाणु पिकांवर येणाऱ्या अनेक प्रकारच्या रोगकारक बुरशींच्या नियंत्रणासाठी प्रभावी असुन डाळींब, द्राक्षे, भात, केळी, मिरची, टोमॅटो, हरभरा, भुईमुग, ऊस यासारख्या पिकांवर येणाऱ्या रोपे कोलमोडणे, पानांवरील करपा, मर, मुळकुज, भुरी तसेच डाऊनी मिल्ड्यु यासारख्या बुरशी तसेच जिवाणुजन्य रोगांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. बायोअमृत सुडो मधील सुडोमोनस फ्लोरेसेन्स जिवाणुंची वाढ होत असताना विविध प्रकारची प्रतिजैविके तयार होतात. या प्रतिजैविकांमुळे विविध प्रकारच्या रोगकारक बुरशींचा नाश होतो. रोगकारक बुरशींच्या वाढीसाठी लोहाची आवश्यकता असते. बायोअमृत सुडोमधील सुडोमोनस फ्लोरेसेन्स जिवाणु रोगकारक बुरशींबरोबर लोह मिळविण्याकरिता स्पर्धा करतात. परिणामी रोगकारक बुरशींना योग्य प्रमाणात लोह न मिळाल्यामुळे त्यांच्या वाढिवर प्रतिकुल परिणाम होऊन त्यांची वाढ खुंटते. प्रतिजैविकांप्रमाणेच बायोअमृत सुडो मधील सुडोमोनस फ्लोरेसेन्स विकरे तयार करते. ही विकरे रोगकारक बुरशींच्या पेशीभित्तीका नष्ट करुन त्यांच्यावर नियंत्रण मिळवितात. बायोअमृत सुडो मधील सुडोमोनस फ्लोरेसेन्सचा वापर केल्याने वनस्पतींच्या पेशींमधील संरक्षक गुणसुत्रे कार्यरत होऊन वाढपिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढन्यास मदत होते. बायोअमृत सुडो मधील सुडोमोनस फ्लोरेसेन्स अधिक काळापर्यंत कार्यक्षम राहत असल्याने दिर्घकाळपर्यंत रोगप्रतिबंधक होतो. बायोअमृत सुडो मधील सुडोमोनस फ्लोरेसेन्स जिवाणु वनस्पतींच्या शरीरात प्रवेश करुन आंतरप्रवाही बुरशीनाशकासारखे अंतर्बाह्य परिणाम करतात.

**पिके :** डाळिंब, द्राक्षे, आंबा, ज्वारी, बाजरी, गहू, मका, ऊस, कापुस, सुर्यफुल, मिरची, वांगी, पेरू तसेच सर्व कडधान्य व फुलझाडे इ.

**वापरण्याची पद्धती :**

फवारणी : ४–५ मिली प्रति लिटर पाणी

आळवणी : १–२ लिटर प्रति २०० लिटर पाणी/एकर

**उपलब्ध पॅकिंग :** १ लिटर, ५ लिटर

---

# बायोअमृत बॅसिलस

**Bacillus**
CFU Count : 2 X $10^9$ cfu/ml




**क्रियाशील घटक :–** **बॅसिलस सबटिलीसचे मिश्रण**

**फायदे :** बायोअमृत बॅसिलस मधील बॅसिलस सबटिलीस ही वनस्पतींच्या वाढिला उत्तेजन देणाऱ्या पदार्थांना वाढवते आणि त्यानुसार बीजांकुरणाची आणि रोपांचीही वाढ होते. बॅसिलस सबटिलीसहे सुक्ष्म जिवाणु असुन ते एक अत्यंत प्रभावी बुरशीनाशक आहे. अणुजीवजन्य रोग, मर व मूळकुज, पानांवरील करपा, झॅन्थोमोनास फळ व पानांवरील काळे डाग, डऊनी, भुरी नियंत्रण यावर बॅसिलस सबटिलीस हे चांगले प्रभावी आहे. बॅसिलस सबटिलीस हे सुक्ष्म जिवाणु बुरशीजन्य रोगांपासुन संरक्षण आणि प्रतिकारक करणारे जीवाणु आहेत. बॅसिलस सबटिलीस हे हानीकारक बुरशीच्या संपर्कात येताच त्यांची वाढ झपाट्याने होऊन त्यांच्याभोवती गुंडाळले जातात व त्यातील अन्नद्रव्ये शोषुन घेतात. परिणामी हानीकारक बुरशी मरतात. बॅसिलस सबटिलीसच्या वापरामुळे पिकांमध्ये वाढ संवर्धक एंझाइम तयार होण्यास मदत होते हे जिवाणु वनस्पतींच्या मुळांवर राहुन त्यांच्या वाढिच्या अवस्थेत संरक्षण प्रदान करतात. त्यामुळे झाडांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

**पिके :** डाळिंब, द्राक्षे, आंबा, ज्वारी, बाजरी, गहू, मका, ऊस, कापुस, सुर्यफुल, मिरची, वांगी, पेरू तसेच सर्व कडधान्य व फुलझाडे इ.

**लक्ष्य रोग :** अणुजीवजन्य रोग, मर व मूळ कुज, पानांवरील करपा, झॅन्थोमोनास फळ व पानांवरील काळे डाग, डाऊनी, भुरी नियंत्रण इ.

**वापरण्याची पद्धती :**

**१) फवारणीसाठी :** ५ मिली प्रतिलिटर पाणी याप्रमाणे व्यवस्थित फवारणी करावी.

**२) आळवणी :** २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर प्रति एकरी, तर ठिबक सिंचनाद्वारे ५ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :** १ लिटर, ५ लिटर

## बायोअमृत बिव्हेरिया — Beauveria

CFU Count : $2 \times 10^{9}$ cfu/ml




**क्रियाशील घटक :– बिव्हेरिया बॅसियानाचे मिश्रण**

**फायदे :** बायोअमृत बिव्हेरिया मधील बिव्हेरिया बॅसियाना ही बुरशी जगाच्या बहुतेक भागात नैसर्गिकरित्या आढळते. या बुरशीचे बीजाणु किटकांच्या त्वचेच्या संपर्कात येताच रुजुन अंकुरीत होतात. किडीच्या शरिरांतर्गत वाढ करून घेतात. संपुर्ण शरिरात बुरशी पसरुन अंतर्गत पोषक घटकांवर जगते. ४८ ते ७२ तासांत किटक मरतो. अशाप्रकारे संपर्कात येणारे अन्य किटकही बुरशीमुळे संक्रमित व रोगग्रस्त होतात.

**पिके :** डाळिंब, द्राक्षे, आंबा, ज्वारी, बाजरी, गहू, मका, ऊस, कापुस, सुर्यफुल, मिरची, वांगी, पेरू तसेच सर्व कडधान्य व फुलझाडे इ.

**लक्ष्य किडी :** विविध पिकांवरील अळ्या, ढेकुण, पाने खाणारे किटक, भुंगे, तुडतुडे इ.

**वापरण्याची पद्धती :**

**१) फवारणीसाठी :** ५ मिली प्रतिलिटर पाणी याप्रमाणे व्यवस्थित फवारणी करावी.

**२) आळवणी :** २०० लिटर पाण्यामध्ये १ ते २ लिटर प्रति एकरी, तर ठिबक सिंचनाद्वारे ५ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग :** १ लिटर, ५ लिटर

---

## बायोअमृत मेटाकिल — Metakill

CFU Count : $2 \times 10^{9}$ cfu/ml




**क्रियाशील घटक :– मेटाऱ्हाझीयम ॲनिसोप्लीईचे मिश्रण**

**फायदे :** बायोअमृत मेटाकिल मधील मेटाऱ्हायझीम ॲनिसोप्लीई : हि कीटकभक्षी बुरशी त्याच्या संपर्कात येणाऱ्या किटकांना संक्रमित करते. कीटकांच्या पृष्ठभागांवर बुरशीचे बीज चिटकल्यानंतर अंकुर वाढू लागतात, मग ते किटकांच्या शरिरात घुसतात. त्या कीटकात अतिशय वेगाने वाढून किडीस मारतात. अशाप्रकारे संसर्ग झालेल्या कीटकांशी संपर्कात येताच त्याच्या त्वचेमध्येही शिरकाव करून घेतात. रूजुन अंकुरीत होऊन वाढतात. या किटकांच्या शरीरातही बुरशीचे बीज पसरते. अंतर्गत पोषक घटकावर जगतो. अशाप्रकारे संपर्कात येणारे अन्य किटकही बुरशीमुळे संक्रमित व रोगग्रस्त होतात.

**पिके :** अन्नधान्य, डाळी, भाजीपाला, फळे, पिके आणि ऊस इत्यादी.

